अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.६६/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/ 3305 दि. ०४/७/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपील/६६/२०२४

Dr. Shahid Raza Burney
Chief Editor Aapla Saptah Newspaper
Magarpatta Road, Hadapsar,
Greater Pune-411013

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

Dr. Shahid Raza Burney, Chief Editor Aapla Saptah Newspaper, Hadapsar, Pune-13 (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२८/०५/२०२४ PUMCO/R/2024/60733 (आ.क्र.२९३९ दि.२८/०५/२०२४) रोजी कार्यालयास प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/२१२९ दि.०४/६/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २८/०५/२०२४ | २८/०५/२०२४ | २७/०६/२०२४ | ०४/०६/२०२४ | ० |

अपिलार्थी यांनी Provided Incomplete, Misleading or False Information असे नमूद करून अपील अर्ज (PUMCO/A/2024/60156, Dt.-05/06/2024) आ.क्र.३४२७ दि.०५/०६/२०२४ व (PUMCO/A/2024/60157, Dt.-07/06/2024) आ.क्र.३६४८, दि.०७/०६/२०२४ रोजी दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०५/०६/२०२४ | ०५/०६/२०२४ | ०३/०७/२०२४ | होय | -- |

अपिल अर्जावर दि.१९/६/२०२४ रोजी सकाळी ११.३० वा. ऑनलाईन स्वरुपात सुनावणी आयोजित करण्यात आल्याचे जा.क्र.उआ(सा.प्र)/आस्था/२३३४ दि.१०/०६/२०२४ रोजीचे पत्राद्वारे कळविण्यात आले होते. अपिलार्थी यांना सुनावणीचे दिवशी दूरध्वनीद्वारे सकाळी संपर्क साधला असता सुनावणी लिंक मिळाली नाही, असे नमूद केले. सबब, सुनावणी काही तांत्रिक कारणास्तव होवू शकली नाही. तसेच, पुणे महानगरपालिकेत कार्यरत सेविका कै.हर्षदा शिंदे, अधिक्षक अभियंता या दिवंगत झाल्याने प्रथम अपिल अधिकारी यांना जावे लागले. त्याचदिवशी दुपारी आर.टी.एस.ची समिती बैठक असल्याने सदर सुनावणी दि.१९/६/२०२४ रोजी होवू शकली नाही.

सदर अपिलावर पुन्हा सुनावणी दि.२८/०६/२०२४ रोजी सकाळी ११.००वा ऑनलाईन स्वरुपात आयोजित करणेबाबत जा.क्र.उआ(सा.प्र)/आस्था/२७९४ दि.२०/०६/२०२४ रोजीचे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. माहिती देताना श्री.अविनाश वंजारी, जन माहिती अधिकारी होते. श्री.वंजारी हे वैद्यकिय रजेवर असल्याने सुनावणीसाठी श्री.दिपक राऊत, प्रशासन अधिकारी यांचेकडे जन माहिती अधिकाऱ्याचा पदभार होता. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी FAA and DMC General Administration, PMC Ms. Pratibha Patil, I am challenging the vague, incorrect, incomplete, and misleading information by PIO Mr. Wanjari. 1. The information is vague and outdated. The information of PIO and FAA is outdated and has been modified. which I am aware. If a PIO has to be an Administrative Officer and Deputy Municipal Commrs as First Appellate Authority, then how can a with Class 3 a Supdt be a First Appellate Authority and Deputy Supdt or a Senior Clerk as PIO. This order was done wrongly and was rescinded later. If it"s in place then why is the DMC an Appellate authority why not the Admin officer or a Superintendent? This is misleading and outdated information 2. Now which is supreme an RTI law or an official letter? The RTI law clearly states where an Assistant PIO

should be posted. it states an APIO should be posed at the Sub-Divisional Level not in headquarters and has defined the the job profile. Then why has the PMC violated the RTI Act and followed the letter? This is again misleading and incorrect. 3. The incompetency and lack of experience of the PIO are seen as he does not fit into the requirement defined in Paa 4 of the GAD GR of 1.2.2017 4. The reply on punishment is also misleading as the State Information Commissioner, Pune Bench has ordered Disciplinary Action and not ordered to give former and present PIOs Mohite and Wanjari just warning. This needs investigations and inquiry and file notings have not been provided 5. Rest I will dwell on during the First Appeal hearing. The FAA has no powers or authority to rescind, pardon, or waive any of the punishments mentioned in the RTI law but to recommend to the State Infomation Commissioner, The First Appellate Authority can also be punished under Section 19 (8) (C) of the RTI Act and can also face disciplinary action for negligence and ignoring the statements if found by the State Information Commissioner, Pune Bench, during Second Appeal hearing. Please refer to Chief Information Commissioner, Circular of 25.6.2019 6. The First Appealing hearing to be conducted by Video Conferencing and cop of the same has to be protected as per GAD GR for evidence in the Commission or Courts. A copy of the VC is provided to the Appellant under Section 2 (f)of the RTI Act. Apart from the hearing and statements of PIO and Appellant to be recorded AD VERBATAM by a Stenographer and transcript to be saved and also be provided duly CERTIFIED to the Appellant असे नमूद करून अपील अर्ज (PUMCO/A/2024/60156, Dt.-05/06/2024) आ.क्र.३४२७ दि.०५/०६/२०२४ व (PUMCO/A/2024/60157, Dt.-07/06/2024) आ.क्र.३६४८,दि.०७/०६/२०२४ (दोन्ही अपील अर्ज हे एकाच विषयाशी निगडीत व एकाच माहिती अधिकार अर्जावर PUMCO/R/2024/60733 दाखल केलेले आहेत) रोजी दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अर्जामध्ये 'Role of APIO in PMC and Violation of Section 4(1)(b) of RTI and Why are Class 3 employees seen on the PMC website as First Appellate Authority and PIOs when these posts are for regular Class 2 and Class 1 officers असे एकूण ४ मुद्दांचे अनुषंगाने माहिती अर्ज दि.२८/५/२०२४ रोजी (PUMCO/R/2024/60733) दाखल केला होता. सदर अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/२१२९ दि.४/६/२०२४ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**<u>अपिल सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अपिलाशी निगडीत नमूद मुद्दे खालीलप्रमाणे:-</u>**

१) **मी दोन** अपील अर्ज दाखल केले होते. ते Pending आहेत. सुनावणी का घेतली नाही?

२) **तुम्ही माझे** अपील Last Moment ला reschedule केले. असे तुम्ही Last Moment ला अपील **रद्द करू शकत** नाही. माझ्याकडे मंत्रालयाचे Schedule असते. मी त्यांना थांबा म्हणायचं का?

३) **Commissioner** यांच्या पेक्षा Law महत्वाचा आहे. Law नुमार काम करणे अपेक्षित आहे.

४) **तुम्ही मला माझ्या** अपिलाचा Registration Number दिला नाही. तुमचा Inward No. आणि **Outward No. दिसत** नाही. माझ्याकडे Registration Number नाही.

५) **तुम्ही मला** २९७१ या जा.क्र. ने उत्तर पाठविले आहे. मी जे अपिलात लिहिलेले आहे त्यावर

मी ठाम आहे.

६) Chief Fire Officer यांना अपिलीय अधिकारी आणि जन माहिती अधिकारी यांना नेमण्याचे अधिकार कोण दिले. Who is Superior? Commissioner or Law. So he cannot make this. दि.१.२.२०१७ चा GR आहे कि FAA आणि PIO कोण असू शकतो.

७) लिपिक हा जन माहिती अधिकारी म्हणून काम कसा करू शकतो? हा जोक आहे.

८) APIO is only to collect RTI Application and Appeals and to transfer it. APIO ची नेमणूक फक्त Sub Divisional Office च्या ठिकाणी करणे असे कायद्यात आहे.

९) G.R updated नाही. You are a public servant. You are not following law. तुम्ही माहिती बरोबर द्या. समजून घ्या. तुम्ही Deputy Commissioner आहात. तुम्ही RTI ची प्रस्तावना वाचली पाहिजे.

१०) You have no powers to punish anyone. You have no authority to take disciplinary action against anyone.

११) खरी माहिती द्या. दिशाभूल करणारी, खोटी माहिती देणे चुकीचे आहे.

१३) We don't want to punish anyone, we want to reform people. Section 4(1) ची माहिती updated हवी.

१४) Appeals are not transferable. तुमच्या dept. ने अपील IT ला forward केले.

१५) People are paying tax and you get salary.

१६) अपीलाबद्दल Bombay High court चे judgment आहे. Mr.Gokha, and Shinde, Bench forest dept., D.K. Deo

१७) कायद्यानुसार कार्य करणे. Do not make mockery of law. Law is supreme.

१८) आपल्याकडे कायदा आहे. शासनाचे G.R आहेत. यांच्यापेक्षा तुम्ही वर आहत का?

१९) तुम्ही दिलेल्या उत्तरामध्ये शेखर गायकवाड सरांचे सहीने जे पत्र आहे त्यानुसार लिपिक म्हणून जन माहिती अधिकारी नेमणे हि तर चेष्टा आहे.

**अपिल अधिकारी यांचे अपिलाशी संबंधित म्हणणे:-**

मा.महापालिका आयुक्त यांच्याकडील एक VC दि.२६/६/२०२४ होती, त्यामुळे त्या दिवशी अपील सुनावणी होऊ शकले नाही. त्यासाठी पुढील दिनांक देण्यासाठी सांगितले होते. तुम्हाला प्रथम अपील अधिकारी व जन माहिती अधिकारी यांची नियुक्तीबाबतचे महापालिका आयुक्त यांच्या सहीचे परिपत्रक देण्यात आले आहे. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी नेमणेबाबत खातेस्तरावर खातेप्रमुख यांना अधिकार देण्यात आले आहेत. याबाबत मा.महापालिका आयुक्त यांचेशी चर्चा करुन निर्णय घ्यावा लागेल. तुम्ही केलेल्या अपीलाचा Registration No., Inward No. व Outward No. तुम्हाला दिलेल्या पत्रामध्ये देण्यात आले आहे, असे अपिलाधिकारी यांनी अपील दरम्यान नमूद केले.

अपिलादरम्यान अपिलार्थी यांनी सामान्य प्रशासन अपील नोंदणी क्र.६६/२०२४ (PUMCO/A/2024/60156,PUMCO/A/2024/60157-दोन्ही अपील अर्ज हे एकाच विषयाशी निगडीत व एकाच माहिती अधिकार अर्जावर दाखल केलेले आहेत) व ईमेलद्वारे प्राप्त अपील क्र.६८/२०२४ (आ.क्र.४५७६, दि.२५/०६/२०२४) या दोन्ही अपिलाबाबत याच अपिलात आपले मुद्दे मांडलेले आहेत. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ४(१) ची माहिती अद्ययावत करणेबाबत कार्यालयीन परिपत्रक प्रसृत करण्यात आले आहे त्याची प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) माहिती अधिकार अधिनियम २००५ चे तरतुदीनुसार सहाय्यक जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकारात अंतिम माहिती देताना स्वाक्षरी करु नये याबाबत कार्यालयीन परिपत्रक मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे स्वाक्षरीने काढण्यात यावे.

३) सामान्य प्रशासन विभाग यांनी माहिती तंत्रज्ञान विभागाशी समन्वय साधून प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांची माहे जून २०२४ अखेरची माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करणे.

४) माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी पत्रव्यवहार करताना त्यात आपले नाव, पदनाम, कार्यालयीन पत्ता, इमेल व संपर्क क्र., ऑनलाईन प्राप्त अर्जाचा नोंदणी क्रमांक इ.बाबी नमूद करणेबाबत सर्व कार्यालयांना अवगत करणेबाबत मा.अति.महापालिका आयुक्त (ज) यांचे स्वाक्षरीने कार्यालयीन परिपत्रक काढण्यात यावे.

वरील आदेशातील अ.क्र.२ ते ४ चे अनुषंगाने पूर्तता झाल्यानंतर त्यांच्या प्रति अपिलार्थीस विनामूल्य उपलब्ध करून देण्यात यावे. सबब, सदर अपिल क्र.६६/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे. सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका.